## परिपत्रक 245

**विषय :- नैमित्तीक रजेबाबत ...**

**धर्मादाय** संघटनेतील सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष सोबत जोडलेल्या परिपत्रक क्रमांक 196, दिनांक 5 जानेवारी, 1976 व क्रमांक 210, दिनांक 11 जानेवारी 1977 कडे देण्यात येत आहे. वरील पत्रकांत थोडक्या मुदतीसाठी पाठविलेल्या रजेबाबत सूचना दिलेल्या असतानासुध्दा असे आढळून आलेले आहे की, बरेचसे कर्मचारी नवीन वर्ष सुरु झाल्यावर अर्ध्या वर्षातच त्यांचे खाती असलेली सर्व नैमित्तीक रजा उपभोगून मग कमी मुदतीच्या अर्जित रजेसाठी अथवा परिवर्तीत रजेसाठी अर्ज करतात. तरी आता या परिपत्रकान्वये पुन्हा सूचना देण्यातयेत आहे की, थोडया मुदतीचा अर्ज वैद्यकीय दाखला जोडून केलेला नसेल किंवा अर्जित रजेसाठी कारण सबळ देण्यात आलेले नसेल व मुदत एक आठवडयापेक्षा कमी असेल व अधिकाऱ्यांची रजेसाठी पूर्व परवानगी घेतली नसेल तर अशा तऱ्हेचे अर्ज नैमित्तीक रजा सोडून विचारात घेतले जाणार नाहीत. नैमित्तीक रजा ही अचानक व आळता न येणाऱ्या कामांसाठी घ्यावयाची असते व ती क्षुल्लक कारणासाठी संपवावयाची नसते.

सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी या सूचना त्यांचे हाताखाली काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनांस आणाव्यांत व अशा थोडया मुदतीसाठी पाठविण्यात आलेल्या अर्जाचे कारण सत्य व अपरिहार्य आहे का ? हे पडताळून पाहून घेऊन त्याप्रमाणे अर्ज पाठविताना विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांचा अभिप्राय द्यावा.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक 4 एप्रिल, 1984.